## *Appendix XVIII (xi)*, (Vide Article - 18.03)

राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम राबविण्याकरीता
<u>राज्य वन विकास यंत्रणेची (SFDA) स्थापना</u>

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक - एफडीएम २०१०/प्र.क्र.३८/फ-२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - २.७.२०१०

वाचा :- १) महाराष्ट्र शासन निर्णय पत्र क्रमांक सीएसएस-१०९९/प्र.क्र.१६१/फ-२,दि.२०/१/२००१.
२) केंद्र शासनाचे पत्र क्रमांक एफ.नंबर.२५.१.१/९९-बी-२,दिनांक १०/१२/२००९
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन दल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१ सी/वविय -मा.सु./प्र.क्र.४८/२७७६/०९-१० दि.२.३.२०१०.

**प्रस्तावना**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने राज्यातील वनक्षेत्र व वनक्षेत्राच्या परिसरात राहणाऱ्या लोकांच्या विकासासाठी वन विकास यंत्रणेची (FDA) स्थापना करण्यास राज्य शासनाने संदर्भ क्रमांक १वरील शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे. ह्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील ४७ वनविभाग/ उपविभागात वन विकास यंत्रणा स्थापित करण्यात आल्या आहेत. ह्या वन विकास अभिकरणाच्या माध्यमातून आजमितीस ३३ जिल्ह्यातील १४०७ गावात ही योजना राबविण्यात येत आहे.

केंद्र शासनाकडील पत्र क्रमांक एफ.नंबर.२५.१.१/९९-बी-२, दिनांक १०/१२/२००९ अन्वये राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम राबविण्या संदर्भात सुधारीत मार्गदर्शक सुचना (२००९) निर्गमित करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रमाच्या प्रकल्प व्यवस्थापन विषयक कार्यप्रणालीचे विकेंद्रीकरण करुन ग्रामस्तरावरील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांपर्यंत निधीचे हस्तांतरण कालापव्यय न होता योग्य वेळी होणे, संस्थांची क्षमता बांधणी करणे आणि वनोपजांचा दर्जा मुल्यवृध्दीद्वारे (Value addition) सुधारुन त्यास बाजारपेठ उपलब्ध करुन देणे व याद्वारे संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे जिवनमान उंचाविण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

१. राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने सुधारीत मार्गदर्शक सुचनेद्वारे त्रिस्तरीय संस्थात्मक संरचना अंमलात आणण्याबाबत सुचित केले आहे. त्यानुसार त्रिस्तरीय संस्थात्मक संरचना खालीलप्रमाणे राहील.

१. राज्य स्तरावर ---- राज्य वन विकास यंत्रणा
२. वन विभाग/उप वन विभाग स्तरावर ---- वन विकास यंत्रणा आणि
३. ग्राम स्तरावर ---- संयुक्त वन व्यवस्थापन समिती

वन साधन संपत्तीची पुनर्निमिती आणि वन व्यवस्थापन करणेकरीता ग्राम स्तरावर क्षमता बांधणी करणे हा वरील संस्थांच्या कामांचा केंद्रबिंदू असेल.

४. वरील त्रिस्तरीय संस्थात्मक संरचनेमधील वन विभाग / वन उप विभाग स्तरावरील वन विकास यंत्रणा महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक सीएसएस-१०९९/प्र.क्र.१६३/फ-२, मंत्रालय, मुंबई दिनांक २० जानेवारी २००१ चे निर्णयास अनुसरुन यापूर्वीच राज्यातील सर्व वन विभाग / वन उप विभाग यामध्ये स्थापन करण्यात आलेल्या आहेत. तसेच ग्रामस्तरावरील संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची स्थापना सुध्दा महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एमएफसी / २००० / प्र.क्र.१४३ /फ-२, दिनांक २५/०४/२००३ नुसार करण्यात येत असून आतापावेतो १२६०० (सप्टेंबर,०९ अखेर) इतक्या संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यापैकी २४०७ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या वनविकास यंत्रणे अंतर्गत कार्यरत आहेत. कालांतराने उर्वरीत सर्वच संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचा अंतर्भाव वनविकास यंत्रणे अंतर्गत होणे अपेक्षित आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

केंद्र शासनाकडील संदर्भ क्र.-१ वरील पत्र दिनांक १०/१२/२००९ अन्वये प्राप्त झालेल्या राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रमाच्या सुधारीत मार्गदर्शक सुचना (२००९) ला अनुलक्षून महाराष्ट्र राज्यात राज्य स्तरावर महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणेची (Maharashtra State Forest Development Agency) स्थापना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर यंत्रणेची रचना, सर्वसाधारण समिती व कार्यकारी समितीची संरचना खालील आकृती बंधाप्रमाणे असेल.

## महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणा (MSFDA)

### सर्वसाधारण समिती

| | |
|---|---|
| १) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन-दल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर | अध्यक्ष |
| २) राज्यामधील सर्व वन विकास यंत्रणेचे अध्यक्ष आणि सदस्य सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य |
| ३) केंद्र पुरस्कृत योजनेकरीता वन्यजीव शाखेतील ४ सदस्यांची नेमणूक अध्यक्षांद्वारे करण्यात येईल. | सदस्य |
| ४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा केंद्रस्थ अधिकारी, राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम, म.रा. नागपूर | सदस्य सचिव |

महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणेच्या सर्वसाधारण समितीची सभा वर्षातून कमीतकमी एक वेळा आयोजित केली जाईल.

### कार्यकारी समिती

| | |
|---|---|
| १) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन दल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर | अध्यक्ष |
| २) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक(अर्थसंकल्प,नियोजन व विकास)म.रा. नागपूर तथा केंद्रस्थ अधिकारी राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम म.रा. , नागपूर | सदस्य सचिव |
| ३) अध्यक्षांनी नामनिर्देशित केल्याप्रमाणे तथापी मुख्य वनसंरक्षक या पेक्षा कनिष्ठ नसलेले वनविभाग, सामाजिक वनीकरण आणि वनसंरक्षणाशी संबंधीत अधिकारी. | सदस्य |

४) ग्रामिण विकास विभाग, आदिवासी विकास विभाग आणि महसूल व वन विभाग यांनी नामोनिर्देशीत केल्या प्रमाणे सहसचिव दर्जापेक्षा कमी नसलेले प्रतिनिधी. — सदस्य

५) दोन वन विकास यंत्रणांचे अध्यक्ष आणि त्यापेक्षा भिन्न दोन वन विकास यंत्रणांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सदस्य सचिव चक्राकार पध्दतीने अध्यक्ष नामनिर्देशित करतील त्यानुसार दोन वर्षासाठी. — सदस्य

६) कार्यकारी समिती आवश्यकतेनुसार ईतर सदस्य अंतर्भूत करु शकेल.

कार्यकारी समितीची सभा आवश्यकतेनुसार कितीही वेळा परंतु वर्षातून कमीत कमी दोन वेळा घेतली जाईल.

२. राज्य वन विकास यंत्रणा ह्याची संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत नोंदणी करण्यात येईल व ही संस्था राज्यामधील सर्व वन विकास यंत्रणांचा महासंघ म्हणून कार्य करेल.

३. परस्परांची कर्तव्ये, अधिकार आणि भूमिका स्पष्ट करणारे समझोता अभिलेख संयुक्त वन व्यवस्थापन आणि वन विकास यंत्रणा यांच्या मध्ये तसेच वन विकास यंत्रणा आणि महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणा यांचे दरम्यान केले जातील. त्यामध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समितीची कामे असमाधानकारक आढळल्यास त्यांची आर्थिक मदत बंद करणे आणि दिलेला निधी परत घेण्याचे वन विकास यंत्रणेस असलेल्या अधिकार अंमलबजावणी बाबत पध्दती निश्चित करण्यात येईल.

४. <u>महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणे (MSFDA) ची भूमिका आणि जबाबदाऱ्या खालील प्रमाणे असतील:-</u>

१) महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणा ह्या राज्यात गठित करण्यात आलेल्या सर्व वनविकास यंत्रणांचा संघ (Federation) राहील.

२) वन व वन्यजीवांचे संरक्षण, वनांची पुनर्निर्मिती, पुनरुत्पादन, वनविकास, स्थानिक साधन सोईवर आधारित निसर्ग पर्यटन, वनव्यवस्थापन व अनुषंगीक कामे लोकसहभागातून करणे तसेच केंद्र पुरस्कृत योजनांचे वनक्षेत्र (Forestry Sector) योजनांची अंमलबजावणी विविध कार्यक्रम आणि प्रकल्पांच्या माध्यमातुन करण्यासाठी वन विकास यंत्रणांना कामाचा वार्षिक आराखडा व धोरण मंजुर करुन देणे.
(Approval of Annual work Programme of FDA.)

३) राज्य शासन व त्याच्या विविध यंत्रणाकडून सोपविलेल्या वन विषयक व अनुषंगीक योजना राबविणे.

४) केंद्र शासन, राज्य शासन तसेच शासन मान्य वित्तीय संस्था ईत्यादींचे सहाय्याने तसेच अशा दोन किंवा त्यापेक्षा जास्त यंत्रणे कडून अर्थ सहाय्यित वनविषयक, पडीक जमीन विकास , पाणलोट विकास व अनुषंगीक कार्यक्रम / प्रकल्प तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे.

५) वनविषयक व तदअनुषंगीक कामांव्यतिरिक्त वनावर अवलंबून असलेल्या तसेच वनालगत रहिवासी ग्रामस्थांच्या विकासा करीता तसेच रोजगार निर्मिती करिता सहाय्यभूत असणारी कामे सुध्दा महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणेद्वारे हाती घेणे.

६) महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणेच्या माध्यमातून सुरू असलेल्या योजनांचे उद्दीष्ट साध्य करण्या करीता संदर यंत्रणेस हाती घेण्यात आलेल्या योजना / कामांमध्ये

a. प्राधान्य ठरविणे,
b. सुधारणा / दुरुस्ती करणे,
c. पुर्नमांडणी (Reformulation) करणे,
d. मंजूरी देणे,
e. मार्गदर्शन करणे,
f. सनियंत्रण करणे आणि
g. मुल्यांकन करणे ईत्यादी बाबत संपूर्ण अधिकार असतील.

ही सर्व कामे यंत्रणा स्वत:च्या पातळीवर करेल किंवा या संबंधात वनविकास यंत्रणांना (FDAs) मार्गदर्शन करेल.

७) पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील (Ecofragile) क्षेत्रांचे पुन:स्थापन करण्यास महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणे कडून योग्य प्राधान्य देणे.

८) महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणेचे नियम व नियमावली ( by laws ) मध्ये शासनाच्या मान्यतेने आवश्यक्तेनुसार बदल करणे.

९) अंमलबजावणी यंत्रणांकरीता समझोता अभिलेख ( MOU ) मंजूर करणे.

५. उपरोक्त जबाबदा-या पार पाडण्या करीता महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणेचे स्वतंत्र बचत खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात येईल. सदर बचत खाते संयुक्तरित्या महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणेचे अध्यक्ष आणि सदस्य सचिव हे चालवतील. महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणेस केंद्र शासनाच्या राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रमा अंतर्गत वनविकास यंत्रणा करिता प्राप्त होणारा निधी सदर संयुक्त बचत खात्यात जमा केला जाईल व त्यापैकी देय अनुदान शात दिवसांत संबंधीत वनविकास यंत्रणेस हस्तांतरीत करण्यात येईल. त्या व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य वनविकास यंत्रणेस इतर शासकीय / निमशासकीय यंत्रणे कडून सुद्धा वन व वन्यजीव विकास तसेच वनक्षेत्राच्या परिसरात राहणाऱ्या लोकांच्या विकासासाठी निधी प्राप्त करता येईल. मात्र अशा प्रकरणी अशा इतर प्राप्त होणाऱ्या निधी करिता प्रत्येक प्रकरणी स्वतंत्र बचत खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडून त्या बाबतचा नियमा प्रमाणे स्वतंत्र हिशोब ठेवणे महाराष्ट्र राज्य वनविकास यंत्रणेस आवश्यक राहील.

६. प्रत्येक खात्यात जमा रकमेवर प्राप्त होणारे व्याज हे महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणेसाठी निधीचा अतिरिक्त स्त्रोत समजण्यात येईल व त्याचा हिशोब संबंधित योजने अंतर्गत अंतर्भूत केला जाईल.

७. महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणेचे वार्षिक लेखा परिक्षण C & AG च्या पॅनल वरील Chartered Accountant द्वारे केले जाईल. या व्यतिरिक्त केंद्र शासन किंवा राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण मंडळ यांना किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधीस, तसेच Comptroller and Auditor General of India यांना किंवा त्यांनी नेमलेल्या अधिका-यास महाराष्ट्र राज्य वनविकास यंत्रणेच्या लेखापरिक्षणाचा तसेच लेखासंख्या संबंधी सदर यंत्रणेद्वारे ठेवण्यात येणा-या नोंद पुस्तिका, हिशोब, ईत्यादी तपासण्याचा पूर्ण अधिकार असेल.

८. केंद्र शासन, राष्ट्रीय वनीकरण व पर्यावरण मंडळ आणि राज्य शासन यांनी वेळोवेळी जारी केलेले निर्णय, आदेश, सुचना ईत्यादींचे पालन करणे, महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणा तसेच त्या अंतर्गत कार्य करणा-या वन विकास यंत्रणा आणि संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना बंधनकारक असेल.

**९. पदनिर्मिती :-**

कुठल्याही प्रकारे नविन पदांची निर्मिती राज्य वनविकास यंत्रणा, वनविकास यंत्रणा किंवा संयुक्त वन व्यवस्थापन समिती स्तरावर करणे अभिप्रेत नाही. तथापी भाडे तत्वावर, ठेकेदारी पध्दतीने किंवा बाह्य व्यक्तिकडून कार्यक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी, अहवाल तयार करणे आणि कामांचे मूल्यांकन व लेखापरिक्षण इत्यादी करुन घेता येईल आणि त्या कामांवरील खर्च परफड (Overheads) या शीर्षामधून भागविण्यात येईल.

**१०. वन विकास यंत्रणा आणि संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांचे आस्थापन विषयक:-**

राज्य शासनाने संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाचे नियंत्रणा संबंधात वेळोवेळी जारी केलेले आदेश, सुचना इत्यादी सर्व वनविकास यंत्रणांचे प्रकल्प नियोजन, अंमलबजावणी आणि उपचारीत क्षेत्रापासून होणा-या फायद्यांचे वाटप इत्यादीकरता लागू रहातील. तसेच राज्याची वन संहिता, वन विभागाच्या मार्गदर्शक सुचना, आदेश इत्यादी, ज्या अन्वये क्षेत्रिय कामांचे तपासणी करीता वन अधिका-यांसाठी मापदंड ठरविण्यात आले आहेत ते सर्व राज्य वनविकास यंत्रणे मार्फत हाती घेण्यात आलेल्या राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रमास तसेच इतर कार्यक्रमास जसे चे तसे लागू रहातील.

११. महाराष्ट्र राज्य वन विकास यंत्रणाची नोंदणी करणे तसेच सदर संस्थाचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्याकरीता प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**१२. राज्यस्तरीय समन्वयन समिती :-**

राज्यस्तरीय वन विकास यंत्रणेच्या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती गठीत करण्यात येत असून तिची रचना खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. मा. मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. सचिव (वने) | सदस्य |
| ३. सचिव, पर्यावरण विभाग | --"-- |
| ४. सचिव, ग्राम विकास विभाग | --"-- |
| ५. सचिव, महसूल विभाग | --"-- |
| ६. सचिव, आदिवासी विकास विभाग | --"-- |
| ७. सचिव, पाटबंधारे विभाग | --"-- |
| ८. सचिव, आरोग्य विभाग | --"-- |
| ९. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग | --"-- |
| १०. सचिव, शिक्षण विभाग | --"-- |
| ११. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन दल प्रमुख) | --"-- |
| १२. सहा वनविकास यंत्रणांचे अध्यक्ष किंवा सदस्य सचिव शासकीय सदस्य क्रमवारीने दोन वर्षांकरिता प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी नामनिर्देशित केल्या नुसार प्रत्येकी एक | --"-- |
| १३. राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या सदस्य सचिवांनी नामनिर्देशित केलेले सहा संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांचे प्रत्येकी एक अशासकीय प्रतिनिधी, चक्रकार पध्दतीने, प्रत्येकी दोन वर्षा करीता. | अशासकीय सदस्य |

१४.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक सदस्य सचिव

(अर्थसंकल्प,नियोजन व विकास),

तथा सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य वन विकास संस्था,

तथा मुख्य अधिकारी, राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम, म.रा.

सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(प्रफुल्ल ठाकूर)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. मा. मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
४. महाराष्ट्र शासनाच्या सर्व संबंधीत प्रशासकीय विभागांचे प्रधान सचिव व सचिव,
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
६. संचालक सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. मुख्य वनसंरक्षक (सर्व),
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. वनसंरक्षक (सर्व),
१०. जिल्हाधिकारी (सर्व),
११. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व),
१२. प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व),
१३. उपवनसंरक्षक (सर्व),
१४. जिल्हा विकास अधिकारी, जिल्हा कृषि अधिकारी/ भूसंधारण अधिकारी, जिल्हा,
१५. पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी, जिल्हा उद्योग अधिकारी,
१६. जिल्हा सार्वजनिक आरोग्य अधिकारी,
१७. सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग (वन कक्ष),
१८. निवड नस्ती (फ-२), महसूल व वन विभाग.

-----------